International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

**Original Article**

# सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने राबवलेले उपक्रम

**डॉ. अंकुश तुकाराम करपे**

*सहयोगी प्राध्यापक,*

*अर्थशास्त्र विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा*

**Manuscript ID:** IJAAR-B130384
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 554 - 560**

**Submitted:** 15 Jan.2026
**Revised:** 30 Jan. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
*डॉ. अंकुश तुकाराम करपे*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322596

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.20322596

Creative Commons

OPEN ACCESS

***सार:***

*आज भारताची गणना जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून केली जात असली, तरी विकासाची फळे ही सामान्य लोकांना चाखायला मिळणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.त्यासाठी सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेला महत्त्व प्राप्त झाले आहे.भारतातील आर्थिक असमानता,मानवी विकासातील मागासलेपणा,बेरोजगारी, कृषीची अल्प उत्पादकता, डिजिटल दरी, लिंगभेद, जातिभेद, सामाजिक-अन्याय, दारिद्रय, भ्रष्टाचार, काळा पैसा, असमतोल विकास,महिलांवरील अन्याय व अत्याचार,पायाभूत सुविधांचा निकृष्ट दर्जा व अपुरेपणा,कोरडवाहू शेती,लोकसंख्याशास्त्रीय लाभांश,तांत्रिक मागासलेपणा,भांडवल टंचाई, सदोष प्रशासन,कुपोषण,भूकबळी,उपासमार,दर्जेदार शिक्षण व वैद्यकीय सुविधांचा अभाव,राजकीय नेतृत्वाचा नाकार्तेपणा व स्वार्थीपणा,नैतिक मूल्यांचा ऱ्हास यासारख्या समस्या सर्वसमावेश विकासात अडथळा ठरत आहेत.या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी शासनाने अकराव्या पंचवार्षिक योजने पासून सर्व समावेशक विकास व अधिक वेगवान विकास यावर लक्ष केंद्रित केले आहे.त्यासाठी सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास, यासह विविध प्रकारच्या उपाययोजना व कार्यक्रम राबविले आहेत.त्यासंबंधीचा अभ्यास प्रस्तुत लेखात करून काही उपाय सुचविले आहेत.*

***मुख्य शब्द: सर्वसमावेशक विकास,महिला सबलीकरण, शाश्वत विकास, आर्थिक विषमता, सामाजिक समता, पायाभूत सुविधा, उत्पादन***

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*डॉ. अंकुश तुकाराम करपे. (2026). सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने राबवलेले उपक्रम. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 554 - 560.* https://doi.org/10.5281/zenodo.20322596

**प्रस्तावना:**

भारतासारख्या विविधता असलेल्या देशात जाती, धर्म, लिंग,भौगोलिक असमानता मोठ्या प्रमाणात असल्याने समावेशक विकासाला अलीकडील काळात महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणूनच११व१२ व्या पंचवार्षिक योजनेत सर्व समावेशक विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. समाजातील सर्व घटकांना आर्थिक विकासामध्ये सहभागी करून विकासाची फळे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे सर्व समावेशक विकासामध्ये अपेक्षित असते.भारताच्या संदर्भात सर्वसमावेशक विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे

**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/**
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***

असा नसून सबका साथ सबका विकास असा होतो. सन.२०४० पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करावयाचे असेल तर समाजातील सर्व स्तरातील लोकांचा विकास करणे गरजेचे आहे. विशेषत: समाजातील गरीब व वंचित लोकांना विकासाच्या सर्व संधी निर्माण करून दिल्या तर सर्वसमावेशक विकास साध्य होईल. भारतामध्ये श्रीमंत तुपाशी तर गरीब उपाशी अशी स्थिती असल्याचे दिसते. ही विषमता आर्थिक विकासात बाधा ठरत आहे. ज्याप्रमाणे जगाच्या एखाद्या कानाकोपऱ्यातील दारिद्र्य हे संपूर्ण जगाच्या सुसंपन्नतेला धोका निर्माण करते. त्याचप्रमाणे विकासातील असमानता ही देशाच्या अस्तित्वाला धोका निर्माण करते. तेव्हा हा धोका टाळण्यासाठी सर्वसमावेशक विकास घडवून आणणे हे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेसमोरील महत्त्वाचे आव्हान आहे. त्यासाठी सर्वांना समान संधी,दारिद्र्य निर्मुलन, रोजगार संधी, पायाभूत सुविधांचा विकास, भेदभाव मुक्त समाजव्यवस्था, शाश्वत विकास या सर्वसमावेशक विकासाच्या पैलू वर भर देणे गरजेचे आहे.

.

**संशोधन साहित्याचा आढावा:**

**१) प्रा. एस. महेंद्र देव:** (२००९) प्रस्तुत 'Inclusive growth, poverty and economic development in India'या लेखात त्यांनी कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रातील क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा व रोजगार निर्मिती यांचे प्रमाण यांचा अभ्यास केला. यामध्ये त्यांना असे दिसून आले,की कृषी क्षेत्रातून ५७ टक्के रोजगार निर्माण होतो. मात्र राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीचा हिस्सा २०टक्के आहे. उद्योग क्षेत्रातून १८ टक्के रोजगार निर्माण होतो व राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा २३ टक्के आहे. सेवा क्षेत्रातून २५ टक्के रोजगार निर्माण होतो व राष्ट्रीय उत्पन्नात सर्वाधिक ५७ टक्के हिस्सा आहे. तसेच या लेखात सर्वसमावेशक विकासासाठी गरिबी निर्मूलन,रोजगार निर्मिती,कृषी विकास,प्रादेशिक समतोल, राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नातील वाढ असे उपाय सुचवले आहेत.

**२) डॉ. किसलय सिन्हा:** (२०१५) प्रस्तुत 'समावेशी विकास और भारत' या संशोधन निबंधात त्यांनी सर्वसमावेशक विकासासाठी सर्वांना समान संधी व सर्वांना समान लाभ मिळणे गरजेचे आहे,तसेच सर्व समावेशक विकास हा उत्पन्नाबरोबरच शिक्षण,आरोग्य, लिंग समानता, रोजगार निर्मिती, सामाजिक सुरक्षितता व राजकारणातील सहभाग इत्यादी घटकावर अवलंबून असल्याचे सांगितले आहे. सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने राबविलेल्या विविध योजना व सर्वसामावेशक विकासासमोरील आव्हाने यांचाही अभ्यास त्यांनी प्रस्तुत लेखात केला आहे.

**३) Snehlata :**(२०१८) प्रस्तुत 'A study of Inclusive growth in India:Its challenges and prospects'लेखात त्यांनी सर्वसमावेशक विकास हा देशातील मोठ्या कामगार वर्गाला सामावून घेणारा असावा तसेच ग्रामीण- शहरी दरी,लिंगभेद, प्रादेशिक असमतोल दूर करणारा असावा असे सुचित केले आहे.बँकिंग सेवांची उपलब्धता,प्रादेशिक असमानता,बँकर्सचा विरोध,बँक शाखांची कमतरता या सर्वसमावेशक विकासातील आर्थिक अडचणी असल्याचे सांगितले आहे.

भारताच्या सर्वसमावेशक विकासासाठी दारिद्र्य निर्मूलन, बेकारी निर्मूलन, आर्थिक विषमता, असमतोल विकास, लिंग भेद, जातीभेद, सामाजिक अन्याय, इत्यादी समस्या सोडविण्यासाठी सरकारने विविध उपाय योजना यशस्वीपणे राबविण्याची गरज प्रतिपादित केली आहे.

**उद्दिष्टे:**

१. सर्वसमावेशक विकासाची संकल्पना अभ्यासणे.

२. सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने राबविलेल्या उपक्रमांचा अभ्यास करणे.

३. सर्वसमावेशक विकासासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेले असून त्यामध्ये विषयासंदर्भातील प्रसिद्ध झालेले लेख,ग्रंथ,मासिक,वार्षिक अंक,विविध अहवाल,सांकेतिक स्थळे इत्यादी द्वारे माहिती संकलित केली आहे.

**सर्वसमावेशक विकासाची संकल्पना :**

समाजातील सर्व स्तरातील लोकांचा विकास म्हणजे सर्वसमावेशक विकास होय. यामध्ये शिक्षण,आरोग्य,रोजगार संधीची समानता,सामाजिक न्याय, लिंग समानता, दारिद्र्य निर्मूलन, बेकारी निर्मूलन,गरीब व वंचितांचा विकास अपेक्षित असतो.

**सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने राबवलेले उपक्रम :**

**१. आर्थिक समावेशन:** सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकारने आर्थिक समावेशन अंतर्गत पुढील उपक्रम राबविले.

**i)प्रधानमंत्री जनधन योजना:-** सन.२०१४ मध्ये ही योजना सुरू केली त्यानुसार प्रत्येक कुटुंबाला बचत खाते, कर्ज, विमा व पेन्शन इत्यादी बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला. त्यामुळे ग्रामीण भागात बँकिंगचे जाळे पसरण्यास मदत झाली.

**ii) प्रधानमंत्री मुद्रा योजना**:- सन.२०१५ पासून सूक्ष्म व लघु उद्योगांच्या विकासासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना सुरू करण्यात आली. त्यानुसार शिशु,किशोर व तरुण या तीन प्रकारचे कर्ज दिले जाते. विशेषतः महिला,एस. सी.,एस.टी.व इतर मागासवर्गीय उद्योजकांना दहा लाख रुपयांपर्यंतचे विनातारण कर्ज दिले जाते.

**iii) थेट लाभ हस्तांतरण :-** या योजनेमुळे सरकारी अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणे शक्य झाले.अन्न अनुदान, पेन्शन, शिष्यवृत्ती, शेतकरी अनुदान लाभार्थ्यांना थेट बँकेत जमा होत आहे. त्यामुळे गळती,भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होत आहे.

**iv)किसान क्रेडिट कार्ड:-** गुप्ता समितीच्या शिफारशीनुसार ऑगस्ट१९९८पासून शेतकऱ्यांना बियाणे,खते,किटकनाशके,पशूपालन,मत्स्यपालन,इत्यादीसाठी कमी व्याजदराने कर्ज देण्याची ही योजना सुरू केली. वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना३टक्के व्याज सवलत दिली जाते. यामुळे सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सुटका होण्यास मदत झाली.त्यामुळे अल्पभूधारक व लहान शेतकरी विकासाच्या प्रवाहात येत आहेत.

**v) अटल पेन्शन योजना:-** असंघटित क्षेत्रातील कामगारांना वृद्धापकाळात आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याच्या उद्देशाने सन.२०१५ पासून ही योजना सुरू करण्यात आली, सामाजिक सुरक्षेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून घरकामगार,मजुर,शेतमजूर,रिक्षाचालक इत्यादींना याचा फायदा होत आहे.

**vi) प्रधानमंत्री जीवनज्योति विमा योजना:-** सन.२०१५ मध्ये ही योजना गरीबातील गरीब व्यक्तीला परवडणाऱ्या दरात जीवन विमा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली. अत्यंत कमी दरात विमा उपलब्ध करून दिल्यामुळे ग्रामीण आणि गरीब लोकांना आर्थिक संरक्षण मिळाले आहे.

**२. शिक्षण आणि मानवी विकास** :- सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी शिक्षण व मानवी विकासाच्या अनुषंगाने सरकारने पुढील उपक्रम राबविले आहेत.

**i) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०:-** भारत ही जागतिक ज्ञान महाशक्ती बनविणे, सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण देणे व सर्वसामान्य व्यक्तीला कौशल्य विकास शिक्षण पुरविणे, या उद्देशाने सन.२०२०पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यास सुरुवात झाली. या धोरणात महिला आणि तृतीयपंथीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा गळतीचा दर कमी करण्यावर ही भर देण्यात आला.

**ii) समग्र शिक्षा अभियान**:-सन.२०१८पासून शालेय शिक्षणातील लिंग भेद आणि सामाजिक दरी कमी करण्याच्या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले. यामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यावर भर देण्यात आला,शाळा ही एक अखंड संस्था या संकल्पनेवर आधारित हे अभियान सुरू असून ते बारावीपर्यंतच्या शिक्षणाशी संबंधित आहे.

**iii)प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना:-** शालेय मुलांचे कुपोषण दूर करणे, शाळेतील उपस्थिती वाढविणे, शाळा गळती रोखणे,सामाजिक एकता निर्माण करणे, इत्यादी उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली. या योजने अंतर्गत पहिली ते आठवी पर्यंतच्या मुलांना सकस व पौष्टिक आहार दिला जातो.

**iv) राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान:-** सन. २०१३ पासून उच्च शिक्षण संस्थांना निधी पुरवून त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याच्या मुख्य उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले. यामध्ये उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे,संशोधनाला प्रोत्साहन देणे, प्रवेश क्षमता वाढविणे,दुर्गम भागात नवीन महाविद्यालय सुरू करणे,अनुसूचित जाती जमाती,महिला आणि अल्पसंख्यांक वर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

**३.कौशल्य विकास व रोजगार निर्मिती:-** कौशल्य विकास व रोजगार निर्मितीद्वारे सर्वसमावेशक विकास घडवून आणण्यासाठी सरकारने पुढील उपक्रम राबविले.

**i)मनरेगा-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५नुसार ग्रामीण भागातील प्रत्येकाला वर्षात किमान १००दिवस रोजगार मिळवून देण्याची हमी देण्यात आली.

**ii)मेक इन इंडिया-** सन.२०१४ पासून भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली. यामध्ये भारताला जगातिक वस्तू उत्पादनाचे केंद्र बनवणे जीडीपी मधील उत्पादनाचा क्षेत्राचा हिस्साह २५टक्के पर्यंत वाढविणे,देशातील तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे व विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे यावर भर देण्यात आला. यामुळे भारतीय उद्योजक नोकरी शोधणारे न राहता, नोकरी देणारे बनत आहेत.

**iii)प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना:-** सन.२०१५पासून जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त ही योजना सुरू केली. 'कौशल्य भारत, कुशल भारत' हे या योजनेचे घोषवाक्य होते.भारतीय तरुणांना विविध उद्योगांशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण देणे, बेरोजगारी कमी करणे, भारतीयांमध्ये जागतिक दर्जाचे कौशल्य विकसित करणे, पारंपारिक कौशल्य उदाहरणार्थ सुतारकाम, विणकाम यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे इत्यादी या योजनेचे उद्देश आहेत. या अंतर्गत४०पेक्षा जास्त उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते.

**iv) प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना:-** विश्वकर्मा यांच्या जयंतीनिमित्त सन.२०२३पासून ही योजना सुरू केली आहे. या अंतर्गत पारंपारिक कारागीर व शिल्पकारांना प्रशिक्षण दिले जाते. पारंपारिक अशा १८ उद्योगांचे१५दिवसांचे कारागिरांना प्रशिक्षण दिले जाते, तसेच त्यांना सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून दिले जाते यामुळे सर्वसमावेशक विकासाला हातभार लागत आहे.

**v) प्रधानमंत्री स्वनिधी योजना:-** सन.२०००पासून शहरी भागातील रस्त्यावरील विक्रेत्यांना भांडवल उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली. या अंतर्गत फेरीवाल्यांना व्याजदर सवलत, कॅशबॅक सुविधा, विनातारण कर्ज इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. फळविक्रेते, भजीवाले, चहावाले यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे.

याशिवाय राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण भागातील गरिबांना स्वयंसहायता गटामध्ये सामील करून उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

**४. सामाजिक संरक्षण आणि गृहनिर्माण:-** सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामाजिक संरक्षण व गृहनिर्माण या अंतर्गत पुढील उपक्रम राबविले जातात.

**i) प्रधानमंत्री आवास योजना :-** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी शहरी व ग्रामीण भागात ही योजना सुरू करण्यात

आली. सर्वांसाठी घरे हे योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामुळे दुर्बल घटकातील लोकांना हक्काचे घर मिळत आहे.

**ii)आरक्षण धोरणे:-** सामाजिक समता निर्माण करण्याच्या उद्देशाने भारतात आरक्षण धोरण राबविले आहे. त्यानुसार अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय,आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक इत्यादीसाठी शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिले आहे. त्यामुळे सामाजिक संरक्षणाबरोबरच समता निर्माण होण्यास मदत होत आहे.

**iii)राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम :-** सन.१९९५ पासून वृद्ध,विधवा आणि दिव्यांग व्यक्तींना पेन्शन स्वरूपात आर्थिक मदत करण्याची ही योजना सुरू केली. यामुळे वृद्ध,विधवा व दिव्यांग व्यक्तींचे जीवनमान उंचावत आहे.

**iv)प्रधानमंत्री जनमन योजना:-** भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर २०२३ पासून आदिवासी समुदायाच्या सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू केली त्यानुसार आदिवासी समुदायांना पक्के घर, रस्ते जोडणी,स्वच्छ पाणी,आरोग्य सुविधा,शिक्षण,विज, दूरसंचार कौशल्य विकास इत्यादी सुविधा पुरविण्यावर भर दिला जातो.त्यामुळे सर्वसमावेशक विकासाला हातभार लागत आहे.

**५. पायाभूत सुविधा व डिजिटल जोडणी :-** सर्वसमावेशक विकास घडवून आणण्यासाठी पायाभूत सुविधा व डिजिटल जोडणी या अंतर्गत पुढील उपक्रम राबवले जातात.

**i) जलजीवन मिशन** :- १५ऑगस्ट २०१९ पासून जलजीवन मिशनची सुरुवात झाली. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळ जोडणीद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी पुरविणे. हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. 'हर घर जल' हे याचे ब्रीद आहे. सन.२०२८ पर्यंत सर्व ग्रामीण भागात स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी नळाद्वारे पुरविण्याचे लक्ष आहे.परिणामी दूषित पाण्यामुळे होणारे आजार दूर होऊन निरोगी भारत निर्माण होईल.

**ii) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना:-** २५ डिसेंबर२००० रोजी अटल बिहारी वाजपेयी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरु करण्यात आली. या अंतर्गत ग्रामीण भागातील रस्ते नसलेल्या वाड्यावस्त्या व गावांना बारमाही रस्त्यांनी जोडले जाते,त्यामुळे ग्रामीण भाग एकमेकाशी व शहराशी जोडण्यास मदत झाली. तसेच वाहतुकीचा वेग वाढला आहे.

**iii) स्वच्छ भारत मिशन:-** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या१५०व्या जयंतीच्या निमित्ताने २ ऑक्टोबर २०१४ रोजी ही योजना सुरू केली. 'एक कदम, स्वच्छता की और' हे ब्रीदवाक्य घेऊन हागणदारी मुक्त गाव करण्याची ही योजना राबविण्यात आली. यामध्ये स्वच्छता व शौचालय निर्मितीवर भर देण्यात आला. त्यामुळे स्वच्छतेबरोबरच महिलांच्या सन्मानातही वाढ झाली आहे.

**iv)भारत नेट प्रकल्प:-** सन.२०११पासून सर्व ग्रामपंचायती हाय-स्पीड ब्रॉडबँडने जोडण्याची ही योजना सुरू केली. त्यामुळे ग्रामीण भागात डिजिटल क्रांती घडुन येत आहे.

**v)डिजिटल इंडिया :-**१जुलै २०१५ रोजी 'सशक्त समाजासाठी, डिजिटल शक्ती' हे ब्रीद समोर ठेवून ही योजना सुरू केली. यामध्ये वेळेची बचत, भ्रष्टाचाराला आळा, व सरकारी कारभारात पारदर्शकता यावर भर देण्यात आला. यामुळे भारत एक डिजिटल अर्थव्यवस्था बनण्यास मदत होत आहे.

**६. आरोग्य आणि पोषण :-** आरोग्य व पोषण याद्वारे सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पुढील योजना राबविण्यात येतात.

**i) आयुष्यमान भारत:-** जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा असलेली ही योजना १५ ऑगस्ट २०१८ पासून सुरू करण्यात आली. यानुसार गरीब कुटुंबातील लोकांना गंभीर आजारावर शस्त्रक्रिया करण्यासाठी ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण दिले जाते.

**ii) राष्ट्रीय आरोग्य मिशन :-** सन.२००५ मध्ये ही योजना सुरू केली. या अंतर्गत गरिब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, महिला आणि बालक यांच्यासाठी जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम,आशा स्वयंसेविका, मोफत औषधे,राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राबविले जातात. ही योजना ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात राबवली जाते.

**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website: https://ijaar.co.in/***
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***

**iii) पोषण अभियान :-** हे अभियान सन. २०१८ मध्ये जागतिक महिला दिनी सुरू करण्यात आले. या अंतर्गत ०ते६ वयोगटातील मुले, गर्भवती महिला,स्तनदा माता, किशोरवयीन मुली, यांना पुरेसा पोषणमूल्य युक्त आहार दिला जातो. यामुळे कुपोषण कमी होण्यास मदत होत आहे.

**v) जन औषधी केंद्रे :-** सन.२०१८पासून सर्वसामान्य व गरीब लोकांना स्वस्त दरात दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही केंद्रे सुरू करण्यात आली. या अंतर्गत १९०० प्रकारची विविध औषधे, सर्जिकल उपकरणे(३००प्रकार),सॅनिटरी नॅपकिन्स,आयुर्वेदिक औषधे इत्यादी सुविधा अल्प दरात पुरविल्या जातात.

याशिवाय भारतात आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी ७८० वैद्यकीय महाविद्यालये, २३ AIIMS संस्था कार्यरत आहेत यामुळे सामान्य व गरीब लोकांपर्यंत आरोग्य सोयींचा विस्तार होण्यास मदत होत आहे.

**निष्कर्ष व उपाय:**

एकंदरीत सरकारने सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'सबका साथ,सबका विकास' हे ब्रीद समोर ठेवून आर्थिक समावेशन, शिक्षण, मानवी विकास, कौशल्य विकास, रोजगार निर्मिती, सामाजिक संरक्षण, गृहनिर्माण, आरोग्य, पोषण, आहार, पायाभूत सुविधा, डिजिटल जोडणी यासह विविध स्वरूपाच्या योजना व उपक्रम राबविले आहेत त्यामुळे सर्वसमावेशक विकासाला चालना मिळत आहे.

मात्र यामध्ये परिपूर्णता येण्यासाठी येणाऱ्या काळात काही सुधारणा करणे गरजेचे आहे.त्यामध्ये प्रत्यक्ष कर प्रणाली सुधारणा, कामगार कायद्यात बदल, योजनेतील पारदर्शकता, भ्रष्टाचाराला आळा, शेतीचे आधुनिकीकरण, पायाभूत सुविधांचा गुणात्मक विस्तार, महिला उद्योजकतेत वाढ, महिला संरक्षण,महिला सबलीकरण, महिला स्वायत्तता, सामाजिक सुरक्षा, कौशल्यपूर्ण दर्जेदार शिक्षण व प्रशिक्षण यांची उपलब्धता, रोजगार निर्मिती, लिंग समानता, ग्रामीण भागात बँकिंग सेवा विस्तार, ग्रामीण विकास,मानवी संसाधनात सुधारणा, सरकारी धोरणात्मक सुधारणा यासारख्या उपयोजना केल्या पाहिजेत.

**संदर्भ सूची :**

1. डॉ.सिन्हा कि.(2015):"समावेशी विकास और भारत,"IJSRT, Vol.1,Issues3,July-August, P.405-407.
2. Snehlata (2018):" A study of inclusive growth in India: it's challenges and prospects"JETIR,Vol.5,Issue12,Dec. P. 1548-1553.
3. Aayog,NITI.(2023),India National Multidimensional Poverty Index,United Nations Development Programme.
4. Goldar, B., Das, P. C., & Dutta, S. (2023). The role of services in India's post-reform economic growth, Structural Change and Economic Dynamics.
5. Virmani, A. (2023).Bharatiya model of inclusive growth:Sabka Sath Sabka Vikas,
6. Virmani, A. (2023b). "Sabka Sath, Sabka Vikas, Sabka Prayas Bharatiya Model of Inclusive Development",April2023 (revised june2023),EGROW Policy.
7. Virmani, A. (2002). A new development paradigm: Employment, entitlement and empowerment.Economic and Political Weekiy,Vol.XXXVII No.22.June1-7,2002,pp.2145-2154.

8. Rangarajan, C., Seema, and E. M. Vibeesh (2014), 'Developments in the Workforce between 2009-10 and 2011-12',Economic and PoliticalWeekiy,Vol.XLIX(23)
9. https://www.niti.gov.in/report-and-publication
10. .https://icrier.org/pdf/Reform99apr.pdf
11. .http://www.niti.gov.in/
12. https://dge.gov.in/dge/schemes_programmes